भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/९**
**महापरिपत्रक क्र. /०९/२०११-१२** **जुलै ०१, २०११**

प्रति,

सर्व वर्ग - १ प्राधिकृत डीलर बँका,

महोदय/महोदया,

**बाह्य व्यावसायिक कर्जे आणि व्यापारी क्रेडिटस यावरील महापरिपत्रक**

निवासी व्यक्तिनी प्राप्त केलेली बाह्य व्यावसायिक कर्जे आणि व्यापारी क्रेडिटस वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए ३/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या कलम ६ सह वाचावयाच्या विदेशी विनिमय अधिनियम, १९९९ च्या कलम ६ च्या उपकलम ३ च्या खंड (ड) ने शासित आहेत.

२. हे महापरिपत्रक "बाह्य व्यावसायिक कर्जे आणि व्यापारी क्रेडिटस" या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एका ठिकाणी एकत्रित करते. परिपत्रकाखालील/या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचनांची सूचि परिशिष्टात दिली आहे.

हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सूर्यास्त कलमासहित निर्गमित करण्यात आले आहे. हे परिपत्रक जुलै १, २०१२ रोजी मागे घेण्यात येईल आणि त्याची जागा विषयावरील अद्यतन परिपत्रक घेईल.

आपली विश्वासु,

(रश्मी फौजदार)
मुख्य महाव्यवस्थापक

**अनुक्रमणिका**

भाग – १
बाह्य व्यावसायिक कर्जे (इसीबी) ......................................................................
१. (अ) स्वयंचलित मार्ग ......................................................................................
पात्र ऋणको ..........................................................................................................
मान्यतापात्र कर्जदार...............................................................................................
रक्कम आणि मुदतपूर्ती ............................................................................................
ऑल-इन-कॉस्ट मर्यादा ..........................................................................
अंतिम उपयोग .......................................................................................................
अनुज्ञेय नसलेले अंतिम उपयोग.................................................................................
हमी .......................................................................................................................
सुरक्षा ...............................................................................................................
इसीबी उत्पन्नाचे समुद्रपार पार्किंग ....................................................................
मुदतपूर्व प्रदान ......................................................................................
विद्यमान इसीबीचा पुनर्वित्तपुरवठा
डेब्ट सर्विसिंग .......................................................................................
कार्यपध्दती ...........................................................................................................
१. (ब) मंजूरी मार्ग...............................................................................................
पात्र ऋणको...........................................................................................................
मान्यतापात्र कर्जदार................................................................................................
रक्कम आणि मुदतपूर्ती
ऑल-इन-कॉस्ट मर्यादा ..............................................................................
अंतिम उपयोग ...................................................................................................
अनुज्ञेय नसलेले अंतिम उपयोग.............................................................................
हमी ......................................................................................................................
सुरक्षा ...................................................................................................................
इसीबीचे उत्पन्न समुद्रपार ठेवणे
पूर्व प्रदान
विद्यमान इसीबीला पुनर्वित्तपुरवठा
डेब्ट सर्व्हिसिंग
कार्यपध्दती
विदेशी मुद्रा एक्सचेंजेबल बॉंड्स
सक्षम समिती ..........................................................................................
२. अहवाल देण्याच्या व्यवस्था आणि महितीचा प्रसार.................................................
अहवाल देण्याच्या व्यवस्था..................................................................................
माहितीचा प्रसार....................................................................................................
३. संरचित कर्तव्ये ..................................................................................................
४.टेक-आऊट फायनान्स
५. इसीबी मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता ..................................................................
६.इसीबीचे इक्विटीत रूपांतर.......................................................................
७.इसीबीचे स्फटिकीकरण ...................................................................................
८.पूर्वाश्रमीच्या युएस डॉलर ५ दशलक्ष योजनेखाली इसीबी...............................
९. कार्यरीतींची तर्कसंगती – एडींना अधिकार देण

भाग – २.............................................................................................
भारतात आयातीसाठी व्यापारी क्रेडिट्स.......................................................
अ) रक्कम आणि मुदतपूर्ती .....................................................................
ब) ऑल-इन-कॉस्ट मर्यादा .....................................................................
क) हमी .........................................................................................
ड) अहवाल देण्याच्या व्यवस्था..................................................................
परिशिष्ट १
नमुना इसीबी.....................................................................................
परिशिष्ट २.......................................................................................
नमुना ८३.........................................................................................
परिशिष्ट ३.......................................................................................
इसीबी-२ ........................................................................................
परिशिष्ट ४.......................................................................................
नमुना - टीसी.....................................................................................
परिशिष्ट ५.......................................................................................
अधिकृत डिलर बँकानी निर्गमित केलेले हमीवरील विवरणपत्र/वचनपत्र/लेटर ऑफ कंफर्ट
परिशिष्ट .........................................................................................

**भाग -१ - बाह्य व्यावसायिक कर्जे**

**बाह्य व्यावसायिक कर्ज (इसीबी)**

अ) बाह्य व्यावसायिक कर्जा(इसीबी)चा संदर्भ किमान सरासरी ३ वर्षांच्या मुदतपूर्तीने अनिवासी कर्जदारांकडून प्राप्त केलेल्या व्यावसायिक कर्जांशी [(बँक कर्जे, खरेदीदाराचे क्रेडिट, पुरवठादाराचे क्रेडिट, प्रतिभूत साधने (म्हणजेच तरंगत्या दराच्या नोटस आणि स्थायी दराचे रोखे)च्या स्वरुपात] आहे.

ब) विदेशी चलन परिवर्तनीय रोखे (एफसीसीबीज) म्हणजे भारतीय कंपनीने विदेशी चलनात निर्गमित केलेले रोखे, आणि ज्यांच्या बाबतीत मुद्दल आणि व्याज विदेशी चलनात देय आहे. त्यापुढे, हे रोखे 'विदेशी चलन परिवर्तनीय रोखे आणि सामान्य समभागांच्या निर्गमाची (डिपॉझीटरी रिसीट मेकॅनिझम मार्फत) योजना, १९९३' नुसार निर्गमित करणे आवश्यक आहे आणि अनिवासी व्यक्तिने कर्ज साधनाला जोडलेल्या समभाग संबंधी वॉरंटसच्या आधारावर, पूर्णपणे किंवा अंशतः, कोणत्याहि पध्दतीने विदेशी चलनात आणि निर्गमित करणाऱ्या कंपनीच्या समभागात परिवर्तनीय अंशदान करणे आवश्यक अहे. इसीबीला लागू असलेले धोरण एफसीसीबीलाहि लागू आहे. एफसीसीबीच्या निर्गमात वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना एफइएमए क्र. १२०/आरबी-२००४ दिनांक जुलै ७, २००४ च्या तरतूदींचेसुध्दा पालन करणे आवश्यक आहे.

क) इसीबीचा उपयोग दोन पध्दतीने करता येईल तो येणेप्रमाणे (१) परिच्छेद १ (अ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्वयंचलित मार्ग आणि (२) परिच्छेद १ (ब) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मंजूरी मार्ग. रियल क्षेत्रातील, विशेष करून भारतातील पायाभूत क्षेत्रातील, गुंतवणूकीसाठी इसीबी स्वयंचलित मार्गाधीन आहेत म्हणजेच आरबीआय/सरकारच्या मंजूरीची गरज नाही. स्वयंचलित मार्गाचा लाभ घेण्यासाठी पात्रतेच्या संबंधात काही शंका असल्यास अर्जदार मंजूरी मार्गाने जाऊ शकतात.

(ड) फॉरिन करन्सी एक्सचेंजेबल बाँड ( एफसीईबी ) म्हणजे, विदेशी मुद्रेत व्यक्त केलेला असा बाँड की ज्याचे मुद्दल व व्याज विदेशी मुद्रेत देय आहे व तो एका इश्युईंग कंपनीद्वारा दिला आहे आणि त्याचे सबस्क्रिप्शन विदेशी मुद्रेत भारताबाहेर निवास करणाऱ्या रहिवाशाने दिले असून ऑफर्ड कंपनी असे म्हटले जाणाऱ्या दुसऱ्याच कंपनीच्या इक्विटी शेअरबरोबर कोणत्याही प्रकारे – संपूर्णतः किंवा अंशतः किंवा कर्ज संलेखांशी संबंधित कोणत्याही इक्विटी-संबंधित वॉरंटच्या धर्तीवर त्याची अदलाबदल केली जाऊ शकते. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या इकॉनॉमिक अफेअर्स विभागाने, अधिसूचना जीएसआर.८९(ई) दि. फेब्रुवारी १५, २००८ अन्वये अधिसूचित केलेल्या "इश्यु ऑफ करन्सी एक्सचेंजेबल बाँड्स (एफसीईबी ) योजना, २००८" चे अनुपालन एफसीईबीने करणे आवश्यक आहे.

(ई) ईसीबी दोन मार्गांनी मिळविता येऊ शकतो – (१) परिच्छेद १ (अ) मध्ये दिलेला स्वयंचलित मार्ग आणि (२) परिच्छेद १ (ब) मध्ये दिलेला मंजुरी मार्ग.

(फ) इसीबीचा उपयोग दोन पध्दतीने करता येईल तो येणेप्रमाणे (१) परिच्छेद १ (अ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्वयंचलित मार्ग आणि (२) परिच्छेद १ (ब) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मंजूरी मार्ग. रियल क्षेत्रातील, विशेष करून भारतातील पायाभूत क्षेत्रातील, गुंतवणूकीसाठी इसीबी स्वयंचलित मार्गाधीन आहेत म्हणजेच आरबीआय/सरकारच्या मंजूरीची गरज नाही. स्वयंचलित मार्गाचा लाभ घेण्यासाठी पात्रतेच्या संबंधात काही शंका असल्यास अर्जदार मंजूरी मार्गाने जाऊ शकतात.

**१.(अ) स्वयंचलित मार्ग**
ईसीबीजसाठी पुढील प्रकारचे प्रस्ताव स्वयंचलित मार्गाखाली येतात.
*i) पात्र ऋणको*

(अ) कॉर्पोरेट्स (बँका, वित्तीय संस्था (एफआयज), गृहनिर्माण वित्तीय संस्था आणि एनएफबीसीज अशासारख्या वित्तीय मध्यस्थ वगळता कंपन्या अधिनियम अधीन नोंदणीकृत) इसीबी उभारण्यास पात्र आहेत. व्यक्ति, न्यास आणि ना-नफा संघटना इसीबी उभारण्यास पात्र नाहीत.

(ब) मायक्रो फाइनॅन्स कार्यात कार्यरत असणाऱ्या बिगर-सरकारी संघटना (एनजीओज) इसीबी प्राप्त करण्यास पात्र आहेत. अशा एनजीओजच्या बाबतीत (१) त्यांचे विदेशी चलनात व्यवहार करण्याचा अधिकार असलेल्या अनुसूचित व्यावसायिक बँकेशी किमान ३ वर्षे समाधानकारक कर्ज संबंध असावेत आणि (२) कर्ज घेणाऱ्या एककाच्या व्यवस्थापन समितीच्या/बोर्डाच्या ‘दृढ आणि योग्य’ स्थितीवरील उचित कार्यासक्तीचे नियुक्त अधिकृत बँकेकडील (एडी) प्रमाणपत्र आवश्यक असेल.

(क) विशेष आर्थिक क्षेत्रातील(एसइझेड) युनीटसना त्यांच्या गरजांसाठी इसीबी उभारण्यास परवानगी आहे. तथापि, ती सहयोगी फर्मला किंवा डोमेस्टिक टॅरिफ एरियातील कोणत्याहि युनीटला इसीबी निधीतून कर्ज देऊ शकत नाहीत किंवा हस्तांतरण करू शकत नाहीत.

**२) मान्यताप्राप्त कर्जदार**

(अ)आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त (१) आंतरराष्ट्रीय बँका, (२) आंतरराष्ट्रीय भांडवल बाजार, (३) बहुपक्षीय वित्तीय संस्था (आयएफसी, एडीबी, सीडीसी वगैरेसारख्या), (४) निर्यात क्रेडिट एजन्सीज, (५) उपकरणांचे पुरवठादार, (६) विदेशी सहयोगी आणि (७) विदेशी समभाग धारक (पूर्वश्रमींचे ओसीबीज वगळून) अशा स्रोतातून इसीबीज उभारू शकतात.
स्वयंचलित मार्गाखाली ‘मान्यताप्राप्त कर्जदार’ म्हणून पात्र होण्यासाठी ‘विदेशी समभाग धारक’चे ऋणको कंपनीत खाली दिल्याप्रमाणे किमान समभाग धारणा असणे आवश्यक आहेः

(१) युएस डॉलर ५ दशलक्षापर्यंतच्या इसीबीसाठी – कर्जदाराने थेट धारण केलेले किमान २५ टक्के समभाग,

(२) युएस डॉलर ५ दशलक्षांपेक्षा अधिक इसीबीसाठी – कर्जदाराने थेट धारण केलेले किमान २५ टक्के आणि ऋण-समभाग प्रमाण ४:१ पेक्षा अधिक नाही (म्हणजेच प्रस्तावित इसीबी थेट विदेशी समभाग धारणेच्या ४ पटींपेक्षा अधिक नाही).

(ब) खालील सुरक्षा उपायाची पूर्तता करणाऱ्या समुद्रपार संघटना आणि व्यक्ति, मायक्रो वित्तपुरवठा कार्यात व्यस्त असणाऱ्या बिगर-सरकारी संघटनाना (एनजीओज) इसीबी पुरवू शकतात.

ईसीबी उपलब्ध करुन देणाऱ्या विदेशातील संस्था व व्यक्ती ह्यांनी पुढील सुरक्षा उपायांचे पालन करावे.

(१) इसीबी पुरवू इच्छिणाऱ्या समुद्रपार संघटनेने यजमान देशाच्या नियामकाच्या नियमनांच्या अधीन असलेल्या समुद्रपार बँकेकडील उचित कार्यासक्तिचे प्रमाणपत्र सादर केले पाहिजे आणि ऋणकोच्या एडी बँकेच्या फाइनॅन्शियल ॲक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे. उचित कार्यासक्तिच्या प्रमाणपत्रात खालील बाबींचा समावेश असावा (१) कर्जदाराचे बँकेत किमान दोन वर्षाच्या कालवधीसाठी खाते आहे, (२) कर्जदार एकक स्थानिक कायद्यानुसार संघटित करण्यात आलेले आहे आणि स्थानिक समाज/व्यावसायिकाना तिच्याबद्दल आदर आहे आणि (३) तिच्याविरूध्द कोणतीहि फौजदारी कारवाई प्रलंबित नाही.

(२) व्यक्तिगत कर्जदाराला समुद्रपार बँकेकडून कर्जदाराचे बँकेत किमान दोन वर्षाच्या कालावधीसाठी खाते असल्याचे उचित कार्यासक्तिचे प्रमाणपत्र प्राप्त करावे लागेल. समुद्रपार कर्जदार सादर करणार असणारी लेखापरिक्षित लेखा विवरणपत्र आणि आयकर विवरणपत्र अशासारखी अन्य पुरावे/कागदपत्रे समुद्रपार बँकेने प्रमाणित केली पाहिजेत आणि पाठविली पाहिजेत. ज्या देशात बँकाना तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या (केवायसी) चे पालन करणे आवश्यक नाही तेथील व्यक्तिगत कर्जदार इसीबी देण्यास पात्र नाहीत.

**३) रक्कम आणि मुदतपूर्ती**

(अ) कॉर्पोरेट एका आर्थिक वर्षात उभी करू शकत असलेली इसीबीची कमाल रक्कम युएस डॉलर ५०० दशलक्ष किंवा त्याच्या सममूल्य एवढी आहे.

(ब) सेवा क्षेत्रातील कॉर्पोरेट संस्था, उदा. हॉटेले, इस्पितळे व सॉफ्टवेअर क्षेत्रे, ह्यांना अंतिम उपयोगासाठी, विदेशी मुद्रा आणि/किंवा रुपयातील भांडवली खर्च भागविण्यासाठी, एका आर्थिक वर्षात युएसडी १०० दशलक्ष किंवा त्याच्या सममूल्य ईसीबींचा लाभ घेण्यास परवानगी आहे. अशा ईसीबींचे उत्पन्न जमीन विकत घेण्यासाठी केला जाऊ नये.

क) एका आर्थिक वर्षात युएस डॉलर २० दशलक्षापर्यंत किंवा त्याच्या सममूल्य इसीबीसाठी किमान तीन वर्षाची सरासरी मुदतपूर्ती,

ड) युएस डॉलर २० दशलक्षावरील आणि यूएस डॉलर ५०० दशलक्षापर्यंत किंवा त्याच्या सममूल्य इसीबीसाठी किमान पाच वर्षाची सरासरी मुदतपूर्ती.

इ) मायक्रो वित्तपुरवठ्यात व्यस्त असणाऱ्या एनजीओज एका आर्थिक वर्षात युएस डॉलर ५ दशलक्षापर्यंत इसीबी उभी करू शकतात. नियुक्त केलेल्या बँकेने ड्रॉडाउन च्या वेळी विदेशी चलनाच्या प्रकटीकरणावर बंधन घातले जाईल याची खात्री करावी,

फ) युएस डॉलर २० दशलक्ष पर्यंतच्या इसीबीसाठी कॉल/पुट पर्याय असू शकतो जर असा पर्याय देण्यापूर्वी त्यानी किमान सरासरी तीन वर्षाच्या मुदतपूर्तीची पूर्तता केली.

**४) ऑल-इन-कॉस्ट मर्यादा**

ऑल-इन-कॉस्ट मध्ये बांधिलकी शुल्क, पूर्व-प्रदान शुल्क, आणि भारतीय रुपयात देय असलेले शुल्क वगळता व्याजाचा दर, अन्य शुल्क आणि विदेशी चलनातील खर्च समाविष्ट आहे. इतकेच नाही तर, ऑल-इन-कॉस्ट्चा हिशोब करण्यासाठी भारतीय रुपयातील विथोल्डिंग टॅक्सचे प्रदान वगळण्यात आले आहे.

इसीबीसाठी ऑल-इन-कॉस्ट मर्यादांचे वेळोवेळी पुनरावलोकन केले जाते. पुनरावलोकन करीपर्यंत वैध मर्यादा खालीलप्रमाणे आहेतः

| **सरासरी मुदतपूर्ती कालावधी** | **६ महिने लिबॉरच्या वर ऑल-इन-कॉस्ट मर्यादा** * |
|---|---|
| तीन वर्षे आणि पाच वर्षांपर्यंत | ३५० बेसिस पॉइंटस |
| पाच वर्षाहून अधिक | २५० बेसिस पॉईंटस |

* कर्जाच्या किंवा लागू असलेल्या बेंचमार्कच्या संबंधित चलनासाठी.

स्थिर व्याजदराच्या कर्जांबाबत, स्वॅप कॉस्ट अधिक मार्जिन हे तरता दर अधिक लागु असलेले मार्जिन ह्यांच्या सममूल्य असावे.

### *५) अंतिम उपयोग*

(अ) इसीबी केवळ गुंतवणूक करण्यासाठी उभारता येईल, इ भांडवली मालाची आयात (विदेश व्यापार धोरणात डीजीएफटीने वर्गीकृत केल्याप्रमाणे), नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी, आणि भारतात स्थावर क्षेत्रात- लघु आणि मध्यम उद्योग (एसएमइ) सह औद्योगिक क्षेत्र आणि पायाभूत सुविधा क्षेत्र- आधुनिकीकरण/ विद्यमान युनीटसचा विस्तार.ट पायाभूत सुविधांची व्याख्या (१) उर्जा (२) दूरसंचार (३) रेल्वे (४) रस्ते, पूलांसहित (५) समुद्री बंदरे आणि विमानतळ (६) औद्योगिक पार्कस आणि (७) नागरी पायाभूत सुविधा (पाणीपुरवठा, स्वच्छता आणि मलनिःसारण प्रकल्प) अशी केली आहे. (८) खाणकाम, अन्वेषण आणि शुद्धीकरण आणि (९) शीत भण्डारण किंवा शीत कक्ष सुविधा ज्यामधये कृषी व संबंधित उत्पादनांवरील प्री- कूलिंग, सागरी उत्पादने आणि मांस ह्यांचा समावेश असतो.

(ब) विदेशातील जेव्ही/डब्ल्युओएस मध्ये थेट भारतीय गुंतवणूकीवरील विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन समुद्रपार संयुक्त साहसे (जेव्ही)/संपूर्ण मालकीच्या उपकंपन्या (डब्ल्युओएस) मध्ये थेट गुंतवणूकीसाठी इसीबीचे उत्पन्न वापरता येईल..

(क) सरकारच्या पीएसयु मधील निर्गुंतवणूक कार्यक्रमाच्या अधीन निर्गुंतवणूक प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात आणि बंधनकारक दुसऱ्या टप्प्यातसुध्दा समभाग प्राप्त करणे यासाठी इसीबीच्या उत्पन्नाचा वापर करण्यास परवानगी आहे.

(ड) मायक्रो वित्तपुरवठा कार्यात व्यस्त असलेल्या एनजीओद्वारे स्व-मदत गटाना कर्ज देण्यासाठी किंवा मायक्रो क्रेडिटसाठी किंवा क्षमता उभारणीसह प्रामाणिक मायक्रो वित्तपुरवठा कार्यांसाठी इसीबीच्या उत्पन्नाचा वापर करता येईल.

(ई) स्पेक्ट्रम ॲलोकेशनसाठी प्रदान

(फ) इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्या ( आयएफसी ) उदा. अबँकीय वित्तीय कंपन्यांना ( एनबीएफसी ) – ( रिझर्व बँकेद्वारा आयएफसी म्हणून वर्गीकृत केल्या गेलेल्या ), ईसीबी धोरणाखाली व्याख्या केल्यानुसार, पायाभूत सोयी क्षेत्रांना कर्ज देण्यासाठी म्हणून, त्यांच्या निजनिधींच्या ५० टक्के पर्यंतच्या रकमेचे, आऊटस्टँडिंग ईसीबीसह, ईसीबीचा लाभ घेण्याची परवानगी आहे. मात्र त्यासाठी

पुढील अटी लागु आहेत. (१) परिपत्रक डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र. १६८/०३.०२.०८९/२००९-१० दि. फेब्रुवारी १२, २०१० मध्ये विहित केलेल्या नॉर्म्सचे केलेले अनुपालन. (२) चलन जोखमीचे संपूर्ण हेजिंग ईसीबीसाठी केलेला अर्ज प्रमाणित करतेवेळी, नेमलेल्या प्राधिकृत डीलरने, विद्यमान नॉर्म्सचे पालन केले असल्याबाबत खात्री करुन घ्यावी. कर्जदाराद्वारे उभ्या केल्या जाणाऱ्या ईसीबी प्रतिभूतीत/सुरक्षित करण्यासाठी

६) **अनुज्ञेय नसलेले अंतिम उपयोग**

(अ) इसीबीच्या उत्पन्नाचा उपयोग पुढे कर्ज देण्यासाठी किंवा भारतातील भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यासाठी किंवा कॉर्पोरेटद्वारा नवीन कंपनी ताब्यात (किंवा तिचा काही हिस्सा) घेण्यासाठी, एस पी व्हीज्, मनी मार्केट म्युच्युअल फंड(एम एम एम एफ), इत्यादिं ची ही गुंतवणूक भांडवल बाजारात दखल घेतली जाते.

(ब) रियल इस्टेट जमीन मालमत्ता क्षेत्रासाठी,

(क) वर्किंग भांडवल, सर्वसाधारण कॉर्पोरेट हेतू आणि विद्यमान रुपया कर्जाची परतफेड करण्यासाठी करता येणार नाही.

**७) हमी**

इसीबीच्या संबंधात बँकाना, वित्तीय संस्थाना आणि नॉन-बँकिंग वित्तीय संस्थांना हमी, स्टँडबाय लेटर ऑफ क्रेडिट, वचनपत्र किंवा लेटरऑफ कंफर्ट देण्याची परवानगी नाही.

**८) सुरक्षा**

कर्जदाराला/पुरवठादाराला देण्याच्या सुरक्षेची निवड ऋणकोवर सोडण्यात आली आहे. तथापि, स्थावर मालमत्तेवर आणि समभागांसारख्या आर्थिक प्रतिभूतींवर समुद्रपार कर्जदाराच्या नावे हक्क निर्माण करणे, अनुक्रमे वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए २१/आरबी-२००० दिनांक ३ मे, २००० च्या नियमन ८ आणि अधिसूचना क्र. एफइएमए २०/आरबी-२००० दिनांक ३ मे, २००० च्या नियमन ३ च्या अधीन आहे.

**९) इसीबी उत्पन्न समुद्रपार ठेवणे**

भारतात प्रत्यक्ष गरज असेपर्यंत इसीबीचे उत्पन्न समुद्रपार ठेवण्यात येईल. विदेशात ठेवलेले इसीबी उत्पन्न खालील रोखीकरणीय मत्तेत गुंतवता येईल (अ)स्टँडर्ड आणि पुअर/फिच आयबीसीए द्वारा एए (-) पेक्षा कमी नसलेले आणि मुडिज द्वारा एए३ पेक्षा कमी नसलेले गुणांकन असलेल्या बँकांच्या ठेवी किंवा ठेव प्रमाणपत्रे किंवा अन्य उत्पादने; (ब) भारतातील अधिकृत डिलरच्या समुद्रपार शाखेत ठेव;आणि (क) उक्त निर्देशिल्याप्रमाणे किमान गुणांकन असणाऱ्या एक वर्ष मुदतपूर्तीची राजकोष पत्रे किंवा अन्य आर्थिक साधने. निधी अशा प्रकारे गुंतवावा कि, ऋणकोला भारतात जेव्हा केव्हा निधीची गरज असेल तेव्हा रोखीकरण करता येईल.

१०) **पूर्व-प्रदान**

अ) एडी बँकाना, युएस डॉलर ५०० दशलक्षापर्यंतच्या इसीबीच्या पूर्व-प्रदानासाठी आरबीआयच्या पूर्वानुमतिविना कर्जासाठी लागू असल्याप्रमाणे ठरवून दिलेल्या किमान सरासरी मुदतपूर्ती कालावधीच्या पूर्ततेच्या अधीन परवानगी देता येईल.

(ब) ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक ईसीबी रकमा आधी देण्याच्या पद्धतीला (प्रीपेमेंट) रिजर्व बँक मान्यताप्राप्त निकषांच्या अंतर्गत विचारात घेईल.

**( ११) विद्यमान ईसीबीचे पुनर्-वित्तसहाय्य**

विद्यमान ईसीबीचे, नवीन ईसीबी उभारुन पुनर्वित्तीकरण केले जाऊ शकते – मात्र अशा नवीन उभारलेल्या ईसीबीचा संपूर्ण खर्च कमी असावा आणि मूळ ईसीबीची शेष ( आऊटस्टँडिंग ) परिपक्वता तीच ठेवली जावी

**१२) डेब्ट सर्व्हिसिंग**

नियुक्त अधिकृत बँकाना, सरकार/भारतीय रिझर्व्हबँक यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या इसीबी मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुद्दल, व्याज आणि अन्य आकारांच्या हप्त्यांचे वित्तप्रेषण करण्यासाठी सर्वसाधारणपणे परवानगी आहे.

**१३) कार्यपध्दती**

स्वयंचलित मार्गाखाली इसीबीच्या उभारणीसाठी ऋणको आरबीआयच्या पूर्व अनुमतिविना मान्यताप्राप्त कर्जदाराबरोबर इसीबी मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करून करार करू शकतो. इसीबी काढण्यापूर्वी ऋणकोने भारतीय रिझर्व्ह बँकेकडून लोन रजिस्ट्रेशन नंबर (एलआरएन) प्राप्त केला पाहिजे. एलआरएन प्राप्त करण्याची कार्यपध्दती परिच्छेद २ (१) (ब) मध्ये सविस्तर दिली आहे.

***१.(ब) मंजूरी मार्ग***

खालील प्रकारचे इसीबीचे प्रस्ताव मंजूरी मार्गात समाविष्ट आहेत.

**१) पात्र ऋणको**

अ) केवळ पायाभूत सुविधांमध्ये किंवा आयडीएफसी, आयएल अँड एफएस. पॉवर फाइनॅन्स कार्पोरेशन, पॉवर ट्रेडिंग कार्पोरेशन, इर्कोन आणि एक्झिम बँक यासारख्या निर्यात वित्तपुरवठ्यात व्यवहार करणाऱ्या आर्थिक संस्थांचा प्रकरणानुसार विचार केला जाईल.

ब) ज्या बँका आणि वित्तीय संस्था सरकारने मंजूर केलेल्या कापड किंवा स्टील क्षेत्राच्या पुनर् उभारणी पॅकेज मध्ये सहभागी झाल्या होत्या त्यांनासुद्धा पॅकेजमधील त्यांच्या गुंतवणूकीच्या आणि सावधगिरीच्या नियमांच्या आधारावर रिझर्व्ह बँकेने निर्धारण केलेल्या प्रमाणात परवानगी आहे. अशा प्रकारे या हेतूने आतापर्यंत प्राप्त केलेले इसीबी त्यांच्या पात्र रकमेतून वजा केले जाईल.

क) बहुपक्षीय वित्तीय संस्था, प्रतिष्ठित विभागीय वित्तीय संस्था, अधिकृत निर्यात क्रेडिट एजन्सीज आणि आंतरराष्ट्रीय बँका यांच्याकडून पायाभूत सुविधा प्रकल्पाना भाडेपट्टीने देण्यासाठी पायाभूत सुविधा उपकरणांच्या आयातीला वित्तपुरवठा करण्यासाठी नॉन-बँकींग वित्तीय कंपन्याद्वारा (एनएफबीसीज) किमान सरासरी पाच वर्षाच्या मुदतपूर्तीची इसीबी.

ड) खालील किमान निकषांचे समाधान करणारे गृहनिर्माण वित्तीय कंपन्यांद्वारा विदेशी चलन परिवर्तनीय रोखे (एफसीसीबी): (१) वित्तीय मध्यस्थाचे आधीच्या तीन वर्षातील किमान नक्त उत्पन्न रु. ५०० कोटींपेक्षा कमी नसावे, (२) बीएसइ किंवा एनएसइ वर सुचीबध्दता, (३) एफसीसीबीचा किमान आकार युएस डॉलर १०० दशलक्ष, (४) अर्जदाराने निधीच्या उपयोगाचा हेतू/योजना सादर करावी.

इ) केवळ पायाभूत सुविधा कंपन्या/प्रकल्पाना वित्तपुरवठा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अधिसूचित केलेली स्पेशल पर्पज व्हेइकल्स, किंवा अन्य कोणतेहि एकक वित्तिय संस्था मानले जाईल आणि अशा एककांची इसीबी मंजूरी मार्गाखाली विचारात घेण्यात येईल.

फ) उत्पादन कार्यात व्यस्त असलेल्या बहुराज्यीय सहकारी संस्थानी खालील निकषांचे समाधान केल्यास १) सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या पतदार आहे आणि २) सहकारी संस्थेने तिचा अद्यतन ताळेबंद सादर केल्यास.

(ग) निर्माणकार्य करीत असलेल्या आणि पुढील निकष पूर्ण करणाऱ्या बहु-राज्यीय सहकारी सोसायट्या – (१) ती सहकारी सोसायटी आर्थिक दृष्टया कर्ज फेड करण्याची क्षमता असलेली आहे (२) सहकारी सोसायटी तिचा अद्यावत ताळेबंद सादर करणारी आहे.

(ह) एसईझेडचे विकसक, विद्यमान ईसीबी धोरणात व्याख्या केल्यानुसार, एसईझेडमध्ये पायाभूत सुविधा, जसे – (१) ऊर्जा (२) टेलिकम्युनिकेशन्स (३) रेल्वे (४) पुलांसह रस्ते (५) बंदरे व विमानतळ (६) इंडस्ट्रियल पार्क्स (७) नागरी पायाभुत सोयी ( पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, मलनिःसारण प्रकल्प ) (८) खनिकर्म, शोध व शुध्दीकरण (९) शीतगृह किंवा शीत कक्ष सुविधा, शेतीविषयक व संबंधित उत्पाद, सागरी उत्पाद व मांस ह्यांचे जतन करण्यासाठी किंवा साठा करण्यासाठी शेत-स्तरावर पूर्वशीतन करणे, अशा पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी ईसीबीचा लाभ घेऊ शकतात.
(आय) सेवा क्षेत्रातील ( उदा. हॉटेल, इस्पितळ व सॉफ्टवेअर ) कॉर्पोरेट्स सोडून स्वयंचलित मार्गाखालील अर्हताप्राप्त अन्य कर्जदार प्रति आर्थिक वर्षात, युएसडी ७५० किंवा त्याच्या सममूल्य असलेल्या ईसीबीचा लाभ घेऊ शकतात. (जे) सेवा क्षेत्रातील ( उदा. हॉटेल, इस्पितळ व सॉफ्टवेअर कॉर्पोरेट्स, प्रति आर्थिक वर्षात, युएसडी २०० दशलक्ष किंवा त्याच्या सममूल्य ईसीबींचा लाभ घेऊ शकतात. (के) विदेशी ईक्विटी धारकांकडून कर्ज मिळविले असल्याच्या अटीवर हॉटेल्स, इस्पितळे व सॉफ्टवेअर क्षेत्र सोडून असलेली सेवा क्षेत्रातील एकके ह्यामुळे, प्रशिक्षण संस्था, आर अँड डी, संकीर्ण सेवा-कंपन्यांना कर्ज मिळण्यास मदत होईल.

***२) मान्यताप्राप्त कर्जदार***

(अ) ऋणको (१) आंतरराष्ट्रीय बँका, (२) आंतरराष्ट्रीय भांडवल बाजार, (३) बहुपक्षीय वित्तीय संस्था (आयएफसी, एडीबी, सीडीसी वगैरेसारख्या), (४) निर्यात क्रेडिट एजन्सीज, (५) उपकरणांचे पुरवठादार, (६) विदेशी सहयोगी आणि (७) विदेशी समभाग धारक (पूर्वाश्रमींच्या ओसीबीजव्यतिरिक्त) अशा आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त स्रोतांकडून इसीबी उभी करू शकतात.

(ब) 'विदेशी समभाग धारकां' कडून, जेथे विदेशी समभाग कर्जदारानी थेट धारण केलेले समभाग २५ टक्के आहेत पण कर्ज-समभाग प्रमाण ४:१ पेक्षा आधिक आहे. (म्हणजे प्रस्तावित इसीबी थेट विदेशी समभाग धारणेपेक्षा ४ पटीने अधिक आहे).

**३) रक्कम आणि मुदतपूर्ती**

कॉर्पोरेटसं मंजूरी मार्गाखाली एका आर्थिक वर्षात स्वयंचलित मार्गाखालील विद्यमान यूएस डॉलर ५०० दशलक्षाच्या मर्यादेच्या वर, १० वर्षाच्या वरील किमान सरासारी मुदतपूर्तीने यूएस डॉलर २५० दशलक्ष अतिरक्त रकमेची इसीबी प्राप्त करू शकतो. अंतिम उपयोग, ऑल-इन-कॉस्ट मर्यादा, मान्यताप्राप्त कर्जदार वगैरे इसीबीचे अन्य निकष पूर्ण करायचे आहेत. परंतु अशा इसीबीसाठी १० वर्षांच्या कालावधीपर्यंत पूर्व-प्रदान आणि कॉल/पुट पर्याय अनुज्ञेय नसतील.

**४) ऑल-इन-कॉस्ट मर्यादा**

ऑल-इन-कॉस्ट मध्ये व्याजाचा दर, बांधिलकी शुल्क वगळता अन्य शुल्क आणि विदेशी चलनातील खर्च, पूर्व-प्रदान शुल्क, आणि भारतीय रुपयात देय असलेले शुल्क , समाविष्ट आहे. इतकेच नाही तर, ऑल-इन-कॉस्ट्चा हिशोब करण्यासाठी भारतीय रुपयातील विथोल्डिंग टॅक्सचे प्रदान वगळण्यात आले आहे.

इसीबीसाठी ऑल-इन-कॉस्ट मर्यादांचे वेळोवेळी पुनरावलोकन केले जाते.
खालील मर्यादा पुनरावललोकनापर्यंत वैध आहेतः

| **सरासरी मुदतपूर्ती कालावाधी** | **६ महिने लिबॅारच्या वर ऑल-इन-कॉस्ट मर्यादा ***|
|---|---|
| तीन वर्षे आणि पाच वर्षांपर्यंत | ३०० बेसिस पॉइंटस |
| पाच वर्षांहून अधिक | २५० बेसिस पॉईंटस |

* कर्जाच्या किंवा लागू असलेल्या बेंचमार्कच्या संबंधित चलनासाठी.

स्थिर दराच्या कर्जांबाबत, स्वॅप कॉस्ट अधिक मार्जिन हे तरता दर अधिक लागु असलेले मार्जिन ह्याच्या सममूल्य असावे

५) **अंतिम उपयोग**

(अ) इसीबी केवळ गुंतवणूक करण्यासाठी उभारता येईल, [ भांडवली मालाची आयात (विदेश व्यापार धोरणात डीजीएफटीने वर्गीकृत केल्याप्रमाणे), नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी, आणि भारतात स्थावर क्षेत्रात- लघु आणि मध्यम उद्योग (एसएमइ) सह औद्योगिक क्षेत्र आणि पायाभूत सुविधा क्षेत्र- आधुनिकीकरण/ विद्यमान युनीटसचा विस्तार.] पायाभूत सुविधांची व्याख्या (१) उर्जा (२) दूरसंचार (३) रेल्वे (४) रस्ते, पूलांसहित (५) समुद्री बंदरे आणि विमानतळ (६) औद्योगिक पार्कस आणि (७) नागरी पायाभूत सुविधा (पाणीपुरवठा, स्वच्छता आणि मलनिःसारण प्रकल्प) अशी केली आहे. (८) खाणकाम, अन्वेषण आणि शुद्धीकरण आणि (९) शीत भण्डारण किंवा शीत कक्ष सुविधा ज्यामधये कृषी व संबंधित उत्पादनांवरील प्री- कूलिंग, सागरी उत्पादने आणि मांस ह्यांचा समावेश असतो.

(ब) विदेशातील जेव्ही/डब्ल्युओएस मध्ये थेट भारतीय गुंतवणूकीवरील विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन समुद्रपार संयुक्त साहसे (जेव्ही)/संपूर्ण मालकीच्या उपकंपन्या (डब्ल्युओएस) मध्ये थेट गुंतवणूकीसाठी इसीबीचे उत्पन्न वापरता येईल..

(क) सरकारच्या पीएसयु मधील निर्गुंतवणूक कार्यक्रमाच्या अधीन निर्गुंतवणूक प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात आणि बंधनकारक दुसऱ्या टप्प्यातसुध्दा समभाग प्राप्त करणे यासाठी इसीबीच्या उत्पन्नाचा वापर करण्यास परवानगी आहे.

(१) सरकारला शेवटच्या हप्त्याचे प्रदान केल्याच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या आत ईसीबी ऊभी केली जावी.

(२) नेमलेल्या एडी वर्ग - १ बँकेने त्या निधीच्या अंतिम उपयोगावर देखरेख ठेवावी.

(३) भारतातील बँकांना कोणत्याही स्वरुपाची हमी देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(४) अर्हताप्राप्त कर्जदार, संपूर्ण खर्च/किंमत, सरासरी परिपक्वता इत्यादि ईसीबीच्या अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

(ई) निर्गुंतवणुक प्रक्रियेमधील शेअर्स मिळविण्याचा ( पहिला टप्पा ) आणि पीएसयु शेअर्सच्या सरकारच्या निर्गुंतवणुक कार्यक्रमाखाली जनतेला देऊ करण्याचा दुसरा अनिवार्य टप्पा.

**अनुज्ञेय नसलेले अंतिम उपयोग**

(अ) इसीबीच्या उत्पन्नाचा उपयोग पुढे कर्ज देण्यासाठी किंवा भारतातील भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यासाठी किंवा कॉर्पोरेटद्वारा नवीन कंपनी ताब्यात (किंवा तिचा काही हिस्सा) घेण्यासाठी, रियल इस्टेट, खेळते भांडवल, सर्वसाधारण कॉर्पोरेट हेतू आणि विद्यमान रुपया कर्जाची परतफेड करण्यासाठी करता येणार नाही.

(ब) रियल इस्टेट जमीन मालमत्ता क्षेत्रासाठी,

(क) वर्किंग भांडवल, सर्वसाधारण कॉर्पोरेट हेतू आणि विद्यमान रुपया कर्जाची परतफेड करण्यासाठी करता येणार नाही.

**हमी**

इसीबीच्या संबंधात बँकाना, वित्तीय संस्थाना आणि नॉन-बँकिंग वित्तीय संस्थाना हमी, स्टँडबाय लेटर ऑफ क्रेडिट, वचनपत्र किंवा लेटरऑफ कंफर्ट देण्याची सामान्यतः परवानगी नाही. एसएमईच्या प्रकरणातील इसीबीच्या संबंधात बँका, वित्तीय संस्था यांच्या हमी/स्टँडबाय लेटर ऑफ क्रेडिट किंवा लेटर ऑफ कंफर्ट देण्यासाठी अर्ज सावधगिरीच्या नियमांच्या गुणवत्तेच्या अधीन विचारात घेतले जातील.

भारतीय वस्त्रोद्योगातील क्षमता विस्तार आणि तंत्रशास्त्रीय आधुनिकीकरण सुलभ व्हावे या दृष्टीने वस्त्र युनीटसच्या आधुनिकीकरण आणि विस्तारासाठी वस्त्र उद्योगातील कंपन्यांच्या इसीबीला बँकानी हमी, स्टँडबाय लेटर्स ऑफ क्रेडिट, वचनपत्रे आणि लेटर्स ऑफ कंफर्टस देण्याबाबत मंजूरी मार्गाखाली सावधगिरीच्या नियमांच्या अधीन विचार केला जाईल.

**सुरक्षा**

कर्जदाराला/पुरवठादाराला देण्याच्या सुरक्षेची निवड ऋणकोवर सोडण्यात आली आहे. तथापि, स्थावर मालमत्तेवर आणि समभागांसारख्या आर्थिक प्रतिभूतींवर समुद्रपार कर्जदाराच्या नावे हक्क निर्माण करणे, अनुक्रमे वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए २१/आरबी-२००० दिनांक ३ मे, २००० च्या नियमन ८ आणि अधिसूचना क्र. एफएएमए २०/आरबी-२००० दिनांक ३ मे, २००० च्या नियमन ३ च्या अधीन आहे.

**इसीबीचे उत्पन्न समुद्रपार ठेवणे**

इसीबीचे उत्पन्न भारतात त्याची प्रत्यक्ष गरज असेपर्यंत समुद्रपार ठेवावे. समुद्रपार ठेवलेली इसीबी खालील रोखीकरणीय मत्तेत गुंतविता येतील (अ) स्टॅंडर्ड अँड पुअर/फिच ने एए (-) पेक्षा कमी नसलेले गुणांकन दिलेल्या किंवा मुडीजने एए३ पेक्षा नसलेले गुणांकन दिलेल्या बँकानी देऊ केलेल्या ठेवी किंवा ठेव प्रमाणपत्रे किंवा अन्य उत्पादने; (ब) भारतातील एडी बँकेच्या समुद्रपार शाखेत ठेवी आणि (क) उक दर्शविल्यआप्रमाणे किमान गुणांकन असलेल्या एक वर्ष मुदतीची राजकोष पत्रे किंवा अन्य आर्थिक साधने. निधी अशा प्रकारे गुंतवावा कि ऋणकोला भारतात जेव्हा केव्हा त्याची गरज असेल तेव्हा रोखीकरण करता यावे.

**पूर्व-प्रदान**

(अ) कर्जाला लागू असलेल्या ठरवून दिलेल्या किमान सरसरी मुदतपूर्ती कालावधीच्या पूर्ततेच्या अधीन एडी बँका, युएस डॉलर ४०० दशलक्षापर्यंतच्या इसीबीच्या पूर्व-प्रदानाला रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिविना परवानगी देऊ शकतात.

(ब) युएस डॉलर ४०० दशलक्षापेक्षा अधिक रकमेच्या इसीबीच्या पुर्वप्रदानाबाबत रिझर्व्ह बँक मंजूरी मार्गाच्या अधीन विचार करू शकते.

**विद्यमान इसीबीला पुनर्वित्तपुरवठा**

विद्यमान इसीबीला, कमी ऑल-इन-कॉस्ट वर नवीन इसीबी उभारणे आणि मूळ इसीबीची शेष मुदतपूर्ती तशीच ठेवण्याच्या अटीवर, नवीन इसीबी उभारून पुनर्वित्तपुरवठा करता येईल.

**डेब्ट सर्विसिंग**

नियुक्त अधिकृत बँकाना, सरकार/भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या इसीबी मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुद्दल, व्याज आणि अन्य आकारांच्या हप्त्यांचे वित्तप्रेषण करण्यासाठी सर्वसाधारणपणे परवानगी आहे.

**कार्यपध्दती**

अर्जदारानी, नियुक्त एडी बँकेमार्फत मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, मध्यवर्ती कार्यालय, बाह्य व्यावसायिक कर्ज खंड, मुंबई – ४०० ००१ यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसह इसीबी नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(१४) <u>विदेशी मुद्रा एक्सचेंजेबल बॉड्स</u> : फॉरिन करन्सी एक्सचेंजेबल बॉंड ( एफसीईबी ) म्हणजे, विदेशी मुद्रेत व्यक्त केलेला बॉंड, ज्याचे मुद्दल व व्याज विदेशी मुद्रेत देय असते, तो एखाद्या इश्युईंग कंपनीने दिला असतो आणि भारताबाहेर निवासी असलेल्या व्यक्तीने विदेशी मुद्रेतच त्याचे सबस्क्रिप्शन केलेले असते व तो दुसऱ्याच कंपनीच्या ( ऑफर्ड कंपनी ) शेअरबरोबर कोणत्याही रितीने, संपूर्णतः किंवा अंशतः किंवा कर्ज संलेखांशी संबंधित अशा कोणत्याही इक्विटी संबंधित वॉरंटच्या आधारावर अदलाबदल केला जाऊ शकतो. अशा एफसीईबीचे मूल्य कोणत्याही मुक्तपणे परिवर्तनीय विदेशी मुद्रेत असू शकते.

**<u>अर्हताप्राप्त प्रचालक ( इश्युअर )</u>** : इश्युईंग कंपनी ही ऑफर्ड कंपनीच्या प्रायोजक गटाचा एक भाग असेल आणि एफसीईबी देतेवेळी देण्यात येणारे इक्विटी शेअर्स तिने धारण केले असतील.

**<u>ऑफर्ड कंपनी</u>** – ऑफर्ड कंपनी ही एक लिस्टेड कंपनी असेल आणि ती विदेशी थेट गुंतवणुक मिळविण्यास पात्र असलेल्या क्षेत्रात कार्यरत असेल व फॉरिन करन्सी कनवर्टिबल बॉंड ( एफसीसीबी ) किंवा एक्सटर्नल कमर्शियल बॉरोईंग्ज ( ईसीबी ) देण्यास किंवा मिळविण्यास पात्र असेल.

**एफसीईबी देण्यास पात्र नसलेल्या संस्था** : भारतीय सिक्युरिटीज मार्केटमधून निधी उभारण्यास पात्र नसलेली भारतीय कंपनी व सिक्युरिटीज मार्केटमध्ये प्रवेश करण्यावर सेबीद्वारा निर्बंध घालण्यात आलेली कंपनी एफसीईबी देण्यास पात्र नाही.

**अर्हता प्राप्त सबस्क्रायबर** :- विदेशी थेट गुंतवणुक धोरणाचे अनुपालन करणाऱ्या आणि एफसीईबी देतेवेळी क्षेत्रात्मक मर्यादांना अनुसरुन असलेल्या संस्था एफसीईबीसाठी सबस्क्राईब करु शकतात. विदेशी थेट गुंतवणुक धोरणाखाली जेथे आवश्यक आहे तेथे विदेशी मुद्रा वर्धक मंडळाची पूर्व मंजुरी घेतली जावी. **एफसीईबीला सबस्क्राईब करण्यास पात्र नसलेल्या संस्था** :- सिक्युरिटिजची खरेदी, विक्री किंवा त्यांचा व्यापार करण्यास सेबीने मनाई केलेल्या संस्था एफसीईबीला सबस्क्राईब करण्यास पात्र नाहीत. **एफसीईबीच्या उत्पन्नाचा अंतिम उपयोग : देणारी कंपनी** : (१) एफसीईबीचे उत्पन्न, ती देणाऱ्या कंपनीद्वारे, विदेशात, थेट गुंतवणुक ( संयुक्त उद्योग/संपूर्ण मालकीच्या विदेशातील कंपन्यांमधील गुंतवणुकींवरील विद्यमान मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन ) तसेच विदेशातील संयुक्त उद्योग/संपूर्ण मालकीच्या कंपन्यात गुंतवणुक करुन केली जाऊ शकते. (२) एफसीईबीचे उत्पन्न, त्या देणाऱ्या कंपन्यांद्वारे प्रायोजक कंपनीमध्ये गुंतविले जाऊ शकते.

**प्रायोजक गट कंपन्या** एफसीईबीच्या उत्पन्नातून गुंतवणुकी मिळत असलेल्या प्रायोजक गट कंपन्या, ती रक्कम, ईसीबी धोरणाखाली विहित केलेल्या अंतिम उपयोगांसाठी वापरु शकतात.

परवानगी नसलेले अंतिम उपयोग – अशा प्रकारच्या गुंतवणुकी मिळविणाऱ्या प्रायोजक गट कंपन्यांना, ते उत्पन्न भारतातील भांडवली बाजार किंवा रियल इस्टेटमध्ये गुंतविण्यास परवानगी नाही.

**संपूर्ण खर्च/किंमत** – एपच्सीईबीवर देय असलेला व्याजदर आणि प्रचालनाचा विदेशी मुद्रेत झालेला खर्च, रिझर्व बँकेने ईसीबी धोरणाखाली विहित केलेल्या ऑल-इन-कॉस्टच्या मर्यादेमध्येच असेल.

**एफसीईबीची किंमत ठरविणद्म** – एपच्सीईबी देतेवेळी, ऑफर केलेल्या लिस्टेड इक्विटी शेअर्सचे विनिमय ( एक्सचेंज ) मूल्य, पुढील दोनपैकी जे अधिक आहे त्यापेक्षा कमी असणार नाही – (१) संबंधित तारखेच्या आधीच्या सहा महिन्यांच्या कालात, स्टॉक एक्सचेंजमध्ये कोट केलेल्या ऑफर्ड कंपनीच्या शेअर्सचे साप्ताहिक उच्च व नीच बंद-मूल्याची सरासरी आणि (२) संबंधित तारखेच्या आधीच्या दोन आठवड्यांच्या कालात, स्टॉक एक्सचेंजमध्ये कोट केलेल्या ऑफर्ड कंपनीच्या शेअर्सचे साप्ताहिक उच्च व नीच बंद-मूल्याची सरासरी

**सरासरी परिपक्वता** – एपच्सीईबीची किमान परिपक्वता पाच वर्षे असेल. अदलाबदलीचा पर्याय, विमोचन करण्यापूर्वी कोणत्याही वेळी वापरता येईल. असा एक्सचेंज ऑप्शन वापरताना त्या एफसीईबीचा धारक, त्या ऑफर्ड शेअर्सची डिलिव्हरी घेईल. एफसीईबीची रोख (निव्वळ ) तडजोड करण्यास परवानगी नाही.

**एफसीईबीचे उत्पन्न विदेशात जमा करणे** – देणाऱ्या/प्रायोजक गट-कंपन्यांद्वारे, ईसीबीसाठी असलेल्या धोरणानुसार, एफसीईबीचे उत्पन्न ठेवता येते आणि/किंवा विदेशात वापरता येते किंवा परवानगीप्राप्त अंतिम उपयोग केला गेला नसल्यास, त्या कर्जदाराच्या भारतामधील एडी वर्ग - १ बँकांमध्ये असलेल्या रुपये खात्यात त्याचे प्रत्यावर्तन केले जाऊ शकते. ईसीबी धोरणाखाली विहित केलेल्या परवानगीप्राप्त अंतिम उपयोगांसाठीच त्या एफसीईबीचे उत्पन्न वापरले जात आहे ह्याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी, एफसीईबी देणाऱ्या कंपनीचीच असेल. प्रचालक ( इश्युईंग ) कंपनीने/प्रायोजक गट-कंपनीद्वारा केलेल्या अंतिम उपयोगांचे ऑडिट-ट्रेल, एडी बँकेद्वारे प्रमाणित करुन रिझर्व बँकेकडे पाठविले जावे.

**कार्यकारी रीत** –ईसीबी उभी करण्यासाठी, मंजुरी मार्गाखाली एफसीईबी देण्यासाठी रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. एफसीईबीबाबतचे अहवाल पाठविण्याची व्यवस्था विद्यमान ईसीबी धोरणानुसार असेल.

**(१५)सक्षम समिती**

रिझर्व्ह बँकेने मंजूरी मार्गाखाली येणाऱ्या प्रस्तावांचा विचार करण्यासाठी एक सक्षम समिती स्थापन केली आहे.

**२. अहवाल देण्याची व्यवस्था आणि माहितीचे वितरण**

**१) अहवाल देण्याची व्यवस्था आणि माहितीचे वितरण**

(अ) कार्यपध्दती सोपी करण्यासाठी, कर्जाच्या करारपत्राची प्रत सादर करण्याची पध्दत कमी करण्यात आली आहे.

(ब) कर्ज नोंदणी क्रमांक मिळण्यासाठी, ऋणकोला कंपनी सेक्रेटरी (सीएस) किंवा चार्टर्ड अकाउंटंट (सिए) यांनी प्रमाणित केलेला नमुना ८३ दोन प्रतीत नियुक्त एडी बँकेला सादर करणे आवश्यक आहे. नियुक्त बँकेने एक प्रत संचालक, बॅलन्स ऑफ पेमेंटस स्टॅटीस्टिक्स डिविजन, डिपार्टमेंट ऑफ स्टॅटीस्टिकल ॲनालायसीस अँड कॉम्प्यूटर सर्विसेस (डिइएसएसीएस), भारतीय रिझर्व्ह बँक, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई ४०० ०५१ यांच्याकडे पाठवायची आहे. (टीपः कर्जाच्या करारपत्राच्या, एफसीसीबीसाठी प्रस्ताव कागदपत्रांच्या प्रती नमुना ८३ समवेत सादर करण्याची आवश्यकता नाही).

(क) डिइएसएसीएस, रिझर्व्ह बँकेकडून कर्ज नोंदणी क्रमांक प्राप्त झाल्यानंतरच ऋणको कर्ज उचलू शकतो.

(ड) ऋणकोनी नियुक्त एडी बँकेने प्रमाणित केलेले इसीबी-२ विवरणपत्र मासिक तत्त्वावर ज्या महिन्यासाठी ते असेल त्याच्या समाप्तीपासून सात दिवसांच्या आत डिइएसएसीएस, आरबीआयकडे पोहोचेल असे पाठविणे आवश्यक आहे.

**(टीपः इसीबीशी संबंधित पूर्वीची सर्व विवरणपत्रे म्हणजे इसीबी ३ - इसीबी ६ जानेवारी ३१, २००४ पासून बंद करण्यात आली आहेत).**

अधिक पारदर्शकता आणण्यासाठी, स्वयंचलित मार्ग आणि मंजूरी मार्ग अशा दोन्ही इसीबीखालील ऋणकोचे नाव, रक्कम, हेतू आणि मुदतपूर्ती याबाबतीतील माहिती रिझर्व्ह बँकेच्या वेबसाइटवर मासिक तत्त्वावर ज्या महिन्याशी ती संबंधित असेल त्यानंतर एक महिन्याच्या अंतराने ठेवण्यात येईल.

***२) माहितीचे वितरण***

अधिक पारदर्शकता आणण्यासाठी, स्वयंचलित मार्ग आणि मंजूरी मार्ग अशा दोन्ही इसीबीखालील ऋणकोचे नाव, रक्कम, हेतू आणि मुदतपूर्ती याबाबतीतील माहिती रिझर्व्ह बँकेच्या वेबसाइटवर मासिक तत्त्वावर ज्या महिन्याशी ती संबंधित असेल त्यानंतर एक महिन्याच्या अंतराने ठेवण्यात येईल.

**३. संरचित कर्तव्ये**

विद्यमान रुपांतरण मूल्यातील बदलामुळे एफसीसीबींची पुनर्ररचना करण्यास परवानगी नाही. रुपांतरण मूल्यातील बदल नसल्यास, एफसीसीबीच्या पुनर्ररचनेसाठीचे प्रस्ताव, त्या प्रस्तावांच्या गुणवत्तेच्या आधाराने मंजुरी-मार्गाखाली विचारात घेतले जातील.

दोन निवासी व्यक्तीं दरम्यान कर्ज घेणे व कर्ज देणे ह्यासाठी विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कोणत्याही तरतुदी लागु होत नाहीत. एखाद्या अनिवासी व्यक्तीने दिलेल्या हमी विरुध्द रुपयांमधील कर्ज दिले जाते तेथे, ती हमी आवाहित करेपर्यंत व अनिवासी हमीदाराला, त्या हमीखालील दायित्व पूर्ण करेपर्यंत, (म्हणजे – (१) भारतात ठेवलेल्या रुपयांमधील शिलज्केतून केलेले प्रदान किंवा (२) भारतातील एडी बँकेत ठेवलेल्या त्याच्या एफसीएनआर(बी)/एनआरई खात्यात डेबिट करुन किंवा (३) भारतात निधीचे प्रेषण करुन ) विदेशी मुद्ेचा कोणताही व्यवहार होत नाही. अशा बाबतीत, अनिवासी हमीदार, ती रक्कम वसुल करण्यासाठी निवासी कर्जदाराविरुध्द त्याच्या हक्काची अंमलबजावणी करु शकतो आणि वसुली झाल्यावर, दायित्व पूर्ण झाले असल्यास, अंतर्गत प्रेषण करुन किंवा एफसीएनआर(बी)/एनआरई खात्यात डेबिट करुन त्या रकमेचे प्रत्यावर्तन करु शकतो. तथापि ते दायित्व, रुपयांमधील शिलकेमधून पूर्ण केले गेले असल्यास, वसुल केलेली रक्कम, अनिवासी हमीदाराच्या एनआरओ खात्यात जमा केली जाऊ शकते.

रिझर्व बँकेने, तिची अधिसूचना क्र.फेमा २९/आरबी-२००० दि. सप्टेंबर २६, २००० अन्वये, मुख्य ऋणको असलेल्या निवासी व्यक्तीद्वारे, भारताबाहेर निवासी असलेल्या व हमीचे दायित्व पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला प्रदान करण्यास सर्वसाधारण परवानगी दिली आहे. त्यानुसार, त्या अनिवासी व्यक्तीने, भारतात प्रेषण केलेल्या निधीमधून किंवा त्याच्या एफसीएनआर(बी)/एनआरई खात्यात डेबिट करुन दायित्व पूर्ण केले असल्याच्या बाबतीत, त्या हमीदाराच्या एफसीएनआर(बी)/एनआरओ खात्यात क्रेडिट करुन पुनरप्रदान केले जावे – मात्र, अशा बाबतीत, प्रेषण/क्रेडिट केलेली रक्कम, त्या अनिवासी हमीदाराने, आवाहित केलेल्या हमीच्या विरुध्द प्रदान केलेल्या रकमेच्या रुपयात सममूल्य रकमेपेक्षा अधिक नसावी.

पात्र असलेल्या अनिवासी संस्थांद्वारांना मिळालेली वाढीव क्रेडिटची सुविधा, केवळ पायाभूत सोयींचा विकास करणाऱ्या भारतीय कंपन्यांद्वारे, परिपत्रक डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र.१६८/०३.०२.०८९/२००९-१० दि. फेब्रुवारी १२, २०१० मधील मार्गदर्शक तत्वांनुसार, रिझर्व बँकेने इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्या ( आयएफसी ) म्हणून वर्गीकृत केलेल्या कंपन्यांद्वारे, भांडवली बाजारातील संलेख ( जसे डिबेंचर्स व बाँड्स ) देऊन उभ्या केलेल्या देशांतर्गत कर्जांनाही स्वयंचलित मार्गाखाली, पुढील अटींवर दिली जावी – (१) बहुपार्श्विक/प्रादेशिक वित्तीय संस्था/सरकारी मालकीच्या विकास वित्तीय संस्था/विद्यमान ईसीबी मार्गदर्शक तत्वांनुसार असलेले थेट विदेशी इक्विटी धारक ( भरणा भांडवलाच्या किमान २५ टक्के धारण ) आणि अप्रत्यक्ष विदेशी इक्विटी धारक (भरणा भांडवलाच्या किमान ५१ऽ धारण ) ह्यांच्याद्वारे क्रेडिटमध्ये वाढ दिली जावी. (२) संबंधित कर्ज संलेखाची परिपक्वता किमान सात वर्षे असावी. (३) ७ वर्षांपर्यंत सरासरी परिपक्वता काल असलेल्या अशा भांडवली बाजार संलेखांसाठी, पूर्व प्रदान आणि कॉल/पुट पर्याय ह्यांना परवानगी नाही. (४) वाढीव कर्जा संबंधाने असलेले हमीशुल्क आणि इतर खर्च हा संबंधित मुद्दल रकमेच्या २ऽ पर्यंतच सीमित असावा. (५) अशा वाढविलेल्या कर्जाचे आवाहन केल्यानंतर, हमीदाराने त्याचे दायित्व पूर्ण केल्यास किंवा, ते अर्हताप्राप्त अनिवासी संस्थेला विदेशी मुद्रेत परत करण्याची परवानगी असल्यास, त्या ट्रेड क्रेडिट/ईसीबीच्या परिपक्वता कालासाठी लागु असलेली संपूर्ण खर्चाची मर्यादा त्या नोव्हेटेड कर्जालाही लागु होते. सरासरी परिपक्वता कालावर अवलंबून असलेल्या संपूर्ण खर्चाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे लागु आहेत

| आवाहन केल्यावर कर्जाचा सरासरी परिपक्वता काल | सहा महिन्यांच्या वर संपूर्ण खर्च मर्यादा लिबॉर । |
|---|---|
| ३ वर्षांपर्यंत | २०० बेसिस पॉईंट्स |
| तीन वर्षे व पाच वर्षांपर्यंत | ३०० बेसिस पॉईंट्स |
| पाच वर्षांहून अधिक | ५०० बेसिस पॉईंट्स |

* कर्ज घेतल्याचे संबंधित चलन किंवा लागु असलेला बेंचमार्क.
(६) कसुरीच्या बाबतीत आणि त्या कर्जावरील प्रक्रिया रुपयांमध्ये केलेली असल्यास, लागु असलेला दर, त्या बाँड्सचे कुपन किंवा, नोव्हेशनच्या तारखेस, भारत सरकारच्या ५ वर्षांच्या सिक्युरिटीच्या बाजार-उत्पन्नावरील २५० बीपीएस ह्यापैकी जे अधिक असेल तेवढा असेल.
(७) असे वाढीव क्रेडिट मिळविण्यास इच्छुक आयएफसींनी, परिपत्रक डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र.१६८/०३.०२.०८९/२००९-१० दि. फेब्रुवारी १२, २०१० मध्ये दिलेल्या पात्रता निकषांचे आणि प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन केले असावे आणि असे नोव्हेटेड कर्ज विदेशी मुद्रेमधील असल्यास, त्या आयएफसीने विदेशी मुद्रेचे संपूर्ण एक्सपोजर हेज करावे आणि
(८) ईसीबीसंबंधाने असलेल्या अहवाल पाठविण्याच्या आवश्यकता अशा नोव्हेटेड कर्जांनाही लागु असतील.

(४) **टेक-आऊट फायनान्स** : विद्यमान नॉर्म्सच्या अनुसार, ईसीबीसह असलेल्या रुपयांमधील देशांतर्गत कर्जांचे पुनर्वित्तीकरण करण्यास परवानगी नाही. तथापि, पायाभूत सोयी क्षेत्रांच्या अर्थसहाय्याच्या विशेष गरजांचा विचार करता, टेक आऊट फायनान्सची योजना तयार करण्यात आली आहे. त्यानुसार, नवीन प्रकल्पांच्या विकासासाठी, बंदरे व विमानतळ, रस्ते व पूल आणि ऊर्जा क्षेत्रातील अर्हताप्राप्त कर्जदारांद्वारे, देशांतर्गत बँकांकडून रुपयांच्या स्वरुपात घेतलेल्या कर्जांसाठी, मंजुरी मार्गाखाली, ईसीबी मार्फत टेक आऊट फायनान्सिंगची व्यवस्था करण्यास पुढील अटींवर परवानगी देण्यात आली आहे — (१) तो पायाभूत सोयी प्रकल्प विकसित करणाऱ्या कॉर्पोरेटने, ठरविलेल्या कमर्शियल ऑपरेशन डेट ( सीओडी ) पासून तीन वर्षांच्या आत त्या कर्जाचे टेक आऊट करण्याबाबत, देशांतर्गत बँका आणि विदेशातील मान्यताप्राप्त धनको ह्यांच्याशी अटींसह किंवा विनाअट टेक आऊट करण्याबाबत त्रिपक्षीय करार केलेला असावा. ह्या करारनाम्यात त्या टेक आऊट करण्याची तारीख निर्देशित केलेली असावी (२) अशा कर्जाचा किमान सरासरी परिपक्वता काल सात वर्षांचा असावा (३) त्या पायाभूत सोयी प्रकल्पाला अर्थसहाय्य करणाऱ्या देशांतर्गत बँकेने टेक आऊट फायनान्सिंग संबंधीच्या विद्यमान प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन केले असावे (४) टेक आऊट होईपर्यंत विदेशातील धनकोला देय असलेले शुल्क ( असल्यास ) प्रतिवर्ष १०० बीपीएसपेक्षा अधिक असू नये. (५) टेक आऊट केल्यानंतर, विदेशातील धनकोने टेक आऊट करण्यास संमती दिलेले शेष कर्ज ईसीबी म्हणून समजले जाईल आणि ते कर्ज एका परिवर्तनीय विदेशी मुद्रेत असेल आणि ईसीबी संबंधीच्या सर्व विद्यमान नॉर्म्सचे पालन केले जावे (६) ह्या टेक आऊट फायनान्सबाबत देशांतर्गत बँका/वित्तीय संस्थांना हमी देण्यास परवानगी नाही (७) टेक आऊटचा प्रसंग घडल्यानंतर, देशांतर्गत बँकेला तिच्या ताळेबंदावर कोणतेही दायित्व दाखविण्यास परवानगी नाही (८) ईसीबी धोरणाखाली विहित केलेल्या अहवाल व्यवस्थांचे अनुसरण केले जावे.

## ५. इसीबी मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता

उभारण्यात /वापरण्यात आलेल्या इसीबीचा इसीबी मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि रिझर्व्ह बँकेच्या नियमन /आदेशांप्रमाणे उपयोग केला जात आहे हे पाहण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित ऋणकोची आहे आणि इसीबी मार्गदर्शक तत्त्वांच्या कोणत्याहि प्रकारच्या उल्लंघनाकडे गंभीरपणे पाहिले जाईल आणि ते एफइएमए १९९९(सीएफ. ए.पी. (डीआयआर मालिका ).परिपत्रक क्रक़. ३१ दिनांक फेब्रुवारी १, २००५) अधीन दंडात्मक कारवाईला आमंत्रण ठरेल. नियुक्त एडी बँकानी प्रमाणित करण्याच्या वेळेस इसीबी उभारणे/उपयोग इसीबी मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुसार आहे याची खात्री करणे आवश्यक आहे.

## ६. इसीबीचे समभागात रूपांतर

(१) इसीबीचे समभागात रूपांतर करण्यास खालील अटींवर परवानगी आहेः

(अ) कंपनीचे कार्य थेट विदेशी गुंतवणूकिसाठी स्वयंचलित मार्गाखाली समाविष्ट आहे किंवा विदेशी समभाग सहभागासाठी कंपनीने सरकारची मंजूरी प्राप्त केली आहे.

(ब) ऋणकोच्या अशा समभागात रूपांतरानंतर विदेशी समभाग धारणा क्षेत्रीय मर्यादेच्या, काही असल्यास, आत आहे, आणि

(क) सूचिबध्द असलेल्या/नसलेल्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, कंपन्यांच्या बाबतीत, समभागांच्या किंमती सेबी आणि पूर्वाश्रमींच्या सीसीआय मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे/नियमनांप्रमाणे आहेत.

(२) इसीबीचे रूपांतर रिझर्व्ह बँकेला खालीलप्रमाणे कळवावेः

(अ) ऋणकोनी **थकित इसीबीचे समभागात संपूर्ण रूपांतर** नमुना एफसी-जीपीआर मध्ये रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला त्याचप्रमाणे इसीबी-२ नमुन्यात डिइएसएसीएस, आरबीआयला ज्या महिन्यासाठी ते असेल त्याच्या समाप्तीपासून सात दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. इसीबी-२ नमुन्याच्या वरच्या बाजूला 'समभागात संपूर्ण रूपांतरित इसीबी' असे शब्द स्पष्टपणे दर्शवावेत. एकदा कळविल्यानंतर, त्यानंतरच्या महिन्यात इसीबी-२ नमुना सादर करणे आवश्यक नाही.

(ब) **थकित इसीबीच्या अंशतः समभागात रूपांतराच्या** बाबतीत, ऋणकोनी रूपांतरित केलेला हिस्सा नमुना एफसी-जीपीआर मध्ये त्याचप्रमाणे इसीबी-२ मध्ये संबंधित विभागीय कार्यालयाला रूपांतर न केलेल्या हिश्शापासून रूपांतर केलेला हिस्सा स्पष्टपणे वेगळा दाखवून कळविणे आवश्यक आहे. इसीबी-२ नमुन्याच्या वरच्या बाजूला 'अंशतः समभागात रूपांतरित इसीबी' असे शब्द स्पष्टपणे दर्शवावेत. त्यानंतरच्या महिन्यात, इसीबीचा शेष भाग इसीबी-२ नमुन्यात डिएएसएसीएसला कळवावा.

### ७. इसीबीचे स्फटिकीकरण

